**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 6.831
Volume - 7, Issue - 06, June - 2024

DOIs:10.2018/SS/202406004 --:-- Research Paper / Article / Review

# आठवी च्या वर्गाला इंग्रजी हस्ताक्षर सुधारण्यासाठी उपाय

**श्रीमती. विद्या रामभाऊ भडके**
सहशिक्षिका, श्री शिवाजी हायस्कुल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोधेगाव ता : शेवगाव जि : अहमदनगर (महाराष्ट्र) भारत
Email - vidyabhadake456@gmail.com

**सारांश :** " श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव या विद्यालयातील इयत्ता आठवी वर्गामधील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी हस्ताक्षर खराब असल्याच्या कारणांचा शोध घेऊन त्यावरील उपाय योजनांची परिणामकारकता अभ्यासणे."

**बीज शब्द :** प्रमाण बद्ध, अक्षराची उंची, प्रमाण बद्ध.

## 1. प्रस्तावना:

1 सुंदर हस्ताक्षर हा एक व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी गुण आहे तसेच सुंदर हस्ताक्षर हाच खरा दागिना या उक्तीप्रमाणे मनुष्याच्या शैक्षणिक जीवनात हस्ताक्षराला अनन्यसाधारण महत्त्व आहे व्यक्तिमत्व ओळखण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणून अनेक तज्ञांनी हस्ताक्षराचा उल्लेख केला आहे.

2 संत कवी रामदासांनी आपल्या दासबोधात हस्ताक्षराचे महत्त्व वर्णिले आहे ज्या ज्या गोष्टीत सौंदर्य सामावले असते ती गोष्ट आपणास मनापासून आवडते कारण नैतिकदृष्ट्या मानवी जीवनाचा सौंदर्य हा स्थायीभाव आहे त्याला हस्ताक्षर अपवाद नाही सौंदर्य पासून आनंदाचा निरागस लाभ आपणास मिळतो सुंदर हस्ताक्षर ही एक कला आहे कोणत्याही व्यक्तीच्या मनात आपल्या सुंदर अक्षरामुळे आदरभाव व प्रेम निर्माण होते दुसऱ्याच्या मनाची नकळत पकड घेण्याचे सुंदर हस्ताक्षर हे प्रभावी साधन आहे.

3 श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव तालुका शेवगाव जिल्हा अहमदनगर या शाळेत सण २०२३२४ या शैक्षणिक वर्षात आठवी वर्गाला अध्यापन करत असताना प्रत्यक्ष लेखन कौशल्याचे अध्यापन उच्च प्राथमिक स्तरावर करताना अनेक अडचणी होत्या परंतु लेखन कौशल्य शिकण्यासाठी व शिकविण्यासाठी अनेक कृती कार्यक्रम जाणीवपूर्वक आखावे लागतात याची योग्य अंमलबजावणी करावी लागते याचा अंदाज संशोधकास आला.

4 लेखनाविषयी थोडी ओळख असलेल्या मुलांना अक्षर ओळख झाल्यानंतर प्रत्यक्ष वहीवर लेखन करताना येणाऱ्या अडचणी संशोधकाने पाहिल्या सहजपणे लेखन करता यावे यासाठी पुढील प्रश्न विद्यार्थ्यांना पडत असल्याचे संशोधकाच्या निदर्शनास आले अक्षराचे वळण घेते वेळी हाताने वळणदार अक्षर कसे काढावे? मुळाक्षरांची उंची लांबी रुंदी दोन शब्दातील अंतर दोन वाक्यातील अंतर प्रमाणबद्ध हस्ताक्षर अशा अनेक अडचणी विद्यार्थ्यांना आल्या या अडचणी दूर करणे गरजेचे असल्याने ही समस्या संशोधनासाठी निवडावी असे संशोधकास वाटले.

5 संशोधकाने वैयक्तिक पणे हस्ताक्षराचे निरीक्षण व परी क्षण करून योग्य बदल घडवून आणल्यास हस्ताक्षर सुधारण्यास निश्चित मदत होईल.

## 2 . समस्या विधान समस्येचे शीर्षक :

श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव तालुका शेवगाव जिल्हा अहमदनगर इयत्ता आठवी वर्गामधील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी हस्ताक्षर खराब असल्याच्या कारणाचा शोध घेऊन त्यावरील उपाय योजनांची परिणामकारकता अभ्यासणे.

**परिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या :**

1 बोधेगाव_ शेवगाव तालुक्यातील व अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर व बीड जिल्ह्याच्या सीमेवरील एक गाव.
2 श्री शिवाजी हायस्कूल_ शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील एक माध्यमिक विद्यालय.
3 आठवी_ विद्यालयातील उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवी अ वर्गाचा समावेश होतो.
4 इंग्रजी_ माध्यमिक विद्यालयातील उच्च प्राथमिक स्तरावरील अनिवार्य भाषा विषय.
5 हस्ताक्षर_ भाषा विषयातील इंग्रजी भाषेच्या लेखन कौशल्य वापरताना हाताने केलेले सुवास्य वळणदार प्रमाणबद्ध व चांगले हस्ताक्षर निकषानुसार केलेले लेखन.
6 खराब_ विशिष्ट अक्षरे योग्य आकारात न लिहिणे त्याचा आकार व प्रमाण बदलणे शब्दांची तोडफोड करणे.

**3. पूर्वतयारी :**

1 संशोधकाने प्रस्तुत कृती संशोधनासाठी इंग्रजी हस्ताक्षर समस्या निवडली.
2 संशोधकांनी इंग्रजी लेखनातील विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.
3 चांगल्या हस्ताक्षराचे संशोधकाने निकष ठरविले.
4 संशोधकाने इंग्रजी हस्ताक्षर सुधारणेसाठी उपक्रम व उपाययोजनांची निश्चिती केली.
5 संशोधकाने उपक्रम व उपाय योजनेसाठी संशोधन पद्धतीची निवड केली.
6 संशोधकाने संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेतला व संदर्भ साहित्याचा अभ्यास करून संशोधन कार्यपद्धत अमलात आणली.
7 संशोधकांनी पूर्व चाचणी व उत्तर चाचणी द्वारे निष्कर्ष व शिफारशी केल्या.

**4. संशोधन समस्येची उद्दिष्टे :**

1 इंग्रजी विषयातील चांगल्या हस्ताक्षराचे निकष ठरविणे.
2 श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव येथील उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवी अ वर्गातील इंग्रजी हस्ताक्षर चांगले नसणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
3 इंग्रजी लेखन करताना विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या चुकांचा शोध घेणे.
4 इंग्रजी विषयातील हस्ताक्षर चुकांच्या परिणामकारकतेसाठी उपक्रम सुचवणे व उपाय योजना करणे.
5 इंग्रजी विषयातील चांगले हस्ताक्षर संदर्भातील निश्चित केलेल्या उपक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**5. संशोधनाचे महत्त्व व गरज :**

महत्व_ इंग्रजी हस्ताक्षराचे महत्त्व विद्यार्थी शिक्षक यांच्यासाठी गरजेचे आहे इंग्रजी हस्ताक्षर खराब असणे ही चांगली गोष्ट नाही व्यक्ती आपले विचार लेखनामधून प्रकट करतो या संशोधनाचा फायदा शालेय स्तरावर सर्व घटकांना होणार आहे सुंदर हस्ताक्षर भाषा विषयासाठी आवश्यक बाब आहे संशोधकाने कृती संशोधनासाठी इंग्रजी हस्ताक्षर समस्या निवडली विद्यार्थ्यांची गुणात्मक वाढ शैक्षणिक प्रगती व व्यावसायिक विकास होतो.

गरज_ इंग्रजी विषयाच्या अध्यापन अध्ययनामध्ये इंग्रजी हस्ताक्षर वळणदार प्रमाणबद्ध व आकर्षक असणे आवश्यक आहे हस्ताक्षरामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होते इंग्रजी लेखन ही काळाची गरज आहे या संगणकाच्या युगामध्ये हस्ताक्षर चांगले असणे आवश्यक व गरज आहे लेखन कौशल्य ही एक कला आहे हस्ताक्षरांमध्ये सुधारणा करणे ही एक विद्यार्थ्यांची गरज आहे.

1 विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षर सुधारण्यासाठी योग्य उपक्रम कार्यपद्धती व उपाय योजना करून सराव केल्यास हस्ताक्षरातील दोष कमी होतात.
2 विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यास हस्ताक्षर सुधारते.
3 प्रस्तुत कृती संशोधनाचा उपयोग माध्यमिक विद्यालयांमधील उच्च प्राथमिक स्तरावर इंग्रजी हस्ताक्षर सुधारणेचा फायदा होतो.

**6. संशोधन समस्येची गृहीतके:**

1 इयत्ता आठवी अ वर्गाला अक्षर ओळख अक्षरांचे आकार उंची रुंदी लांबी यांची ओळख झालेली आहे.
2 एक रेषेवर इंग्रजी हस्ताक्षर विद्यार्थी लिहितो.
3 इंग्रजी शब्द व परिच्छेदाचे विद्यार्थी वाचन करतो.
4 चांगल्या हस्ताक्षराच्या निकषाप्रमाणे प्रमाणबद्ध हस्ताक्षर काढत नाही.

5 इयत्ता आठवी वर्गातील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी हस्ताक्षरामध्ये दोष आहेत.

**7. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

व्याप्ती _सदर संशोधनाचा उपयोग महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक विद्यालयातील इयत्ता प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवी या वर्गाला इंग्रजी भाषा विषयाच्या हस्ताक्षर सुधारणे संदर्भात होईल.

मर्यादा

1 प्रस्तुत कृती संशोधन अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव या विद्यालयातील उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवी या वर्गातील विद्यार्थ्यांपुरता मर्यादित आहे.
2 इयत्ता आठवी अ च्या विद्यार्थ्यांपुरताच मर्यादित आहे.
3 इंग्रजी भाषा विषया पुरते मर्यादित आहे.
4 प्रस्तुत संशोधन हे भाषा विषयाच्या लेखन कौशल्यातील हस्ताक्षर या निवडक घटका पुरते मर्यादित आहे.
5 प्रस्तुत संशोधन हे सन 2023 24 या शैक्षणिक वर्षाची निगडित आहे.

**8. संशोधन पद्धती व चले :**

प्रस्तुत संशोधन समस्येत हस्ताक्षर खराब असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन परिणामकारक अभ्यास असतील असल्याने संशोधकाने कृती संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर केला आहे प्रायोगिक पद्धतीने नुसार उपक्रम व उपाय योजना संशोधकांनी केले आहे.

चले_ ज्या घटकाचा परिणाम अभ्यासलेला जातो या घटकाला स्वतंत्रचल किंवा परिवर्तक असे म्हटले जाते या चलात प्रयोग करणार हेतू पुरस्कार बदल करतो आणि या बदलाचा होणारा परिणाम अभ्यासाला जातो या बदलाचा ज्या घटकावर परिणाम होणार परिणाम पाहिला जातो त्या घटकाला परतंत्रचंद किंवा परतंत्र परिवर्तक असे म्हटले जाते म्हणजेच प्रयोग करणारा स्वतंत्र चलातील बदलाचा परतंत्र परिवर्तकावर होणारा परिणाम अभ्यासितु प्रयोग करताना तुलनेसाठी दोन व्यक्ती अथवा दोन गट घेतो त्यापैकी स्वतंत्र चलातील बदलाचा उच्चार ज्या गटाला दिला जातो त्याला प्रायोगिक गट म्हणतात तर ज्या गटाला हा उपचार दिला जात नाही त्याला नियंत्रित गट असे म्हणतात.

**9. संशोधनाची साधने /सामग्री संकलन :**

प्रस्तुत संशोधनात इंग्रजी विषयाच्या खराब हस्ताक्षर असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन परिणामकारकता अभ्यासावयाची असल्याने संशोधकाने खराब हस्ताक्षराचा शोध घेण्यासाठी संपादन चाचणीची निवड केली आहे

**10. निष्कर्ष:**

- विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षर सुधारण्यासाठी योग्य उपक्रम कार्यपद्धती व उपाय योजना करून सराव केल्यास हस्ताक्षरातील दोष कमी होतात.
- विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यास हस्ताक्षर सुधारते.
- प्रस्तुत कृती संशोधनाचा उपयोग माध्यमिक विद्यालयांमधील उच्च प्राथमिक स्तरावर इंग्रजी हस्ताक्षर सुधारणेचा फायदा होतो. प्रस्तुत संशोधनाच्या सामग्री विश्लेषणासाठी संशोधकाने सांख्यिकी माहितीचे पोस्टके व आलेखाची निवड केली आहे प्रस्तुत संशोधन हे प्रायोगिक पद्धतीच्या साह्याने राबवित असल्याने व समस्येची संबंधित कच्ची संख्यांची माहितीचा अर्थ लावण्यासाठी वरील प्रमाणे विश्लेषणाच्या साधनाची संशोधकाने निवड केली आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1 भिंताडे वी.रा(2009) शैक्षणिक संशोधन पद्धती नित्य नूतन प्रकाशन पुणे.
2 घोरमोडे के यु कला(2008) शैक्षणिक कृती संशोधन माहिती संकलन साधने तंत्रे कार्यवाही विद्या प्रकाशन नागपूर
3 नानकर म.न व स ने र वाय एस(2007) कृती संशोधन व नव उपक्रम विद्या प्रकाशन नागपूर.
4 पाटील ही न्या(1998) मराठी लेखन शास्त्र व कला आंबा प्रकाशन कोल्हापूर.
5 उपासनी ना.के शैक्षणिक संशोधन म.रा पा मंडळ पुणे